# डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस.
# कला आणि वाणिज्य महा.नागपूर

## सांस्कृतिक विभाग

### अहवाल

२०१८- २०१९




सादरकर्ता :

डॉ. मनिषा नागपुरे

सांस्कृतिक विभाग प्रमुख

म.वा.पी. डब्ल्यू. एस. महा. नागपूर

D:/YP(2019)_2019_AHAWAL COLL

# अहवाल

# सांस्कृतिक विभाग समिती

## सत्र २०१८-२०१९

सत्र २०१८-२०१९ या शैक्षणिक सत्राकरिता सांस्कृतिक समितीचे समन्वयक म्हणून शिक्षक परिषदेच्या सभेमध्ये सर्वानुमते डॉ. मनीषा नागपुरे (मराठी विभाग) यांची निवड करण्यात आली. त्यानंतर सांस्कृतिक समितीची गठन करण्याकरिता सभा बोलविण्यात आली. या सभेमध्ये एकूण नऊ सदस्यांची निवड करण्यात येवून सांस्कृतिक समिती तयार करण्यात आली. या बैठकीत सांस्कृतिक विभागाकडून वर्षभर घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची रुपरेषा आखून अंदाजपत्रक तयार करण्यात आले. महाविद्यालयाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष लक्षात घेवून त्या अनुषंगाने विविध सांस्कृतिक कार्यक्रमाची आखणी तयार करण्यात आली.

शैक्षणिक सत्र २०१८-१९ मध्ये प्रवेश घेतलेल्या नवीन विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील सांस्कृतिक कार्यक्रमाची माहिती व्हावी तसेच विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय, विद्यापीठस्तरीय व आंतर-महाविद्यालयीन स्तरावरील विविध स्पर्धेची माहिती मिळवून या स्पर्धेत सहभाग घ्यावा याकरिता उद्‌बोधन वर्गाची व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेकरिता प्रमुख वक्ता म्हणून डॉ. नरेन्द्र बागडे यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना विविध सांस्कृतिक कार्यक्रमाची माहिती देवून विद्यार्थ्यांना विविध स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासंदर्भात प्रोत्साहन दिले. आपला व्यक्तिमत्त्व विकास साधण्यासाठी व आत्मविश्वास वाढविण्यासाठी तसेच मंचधैर्य विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी वकृत्त्व, वादविवाद, गीतगायन, नृत्य; एकांकिका यासारख्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना तयार करण्यात येत असल्याची माहितीही दिली.

या सत्रामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय, विद्यापीठस्तरीय व आंतर-महाविद्यालयीन स्तरावरील विविध स्पर्धेत सहभाग नोंदविला. यात आंतरमहाविद्यालयीन पोस्टर स्पर्धेत एम.ए. भाग-१ (इंग्रजी) चा विद्यार्थी नितीन आडे याला प्रथम पारितोषिक मिळाले तर एल.ए.डी. महाविद्यालय येथे आयोजित गझल स्पर्धेत महाविद्यालयाचा एम.ए.भाग-२ चा विद्यार्थी इकबाल शेख (हिंदी विभाग) याने प्रथम पारितोषिक मिळविले. बी.ए.भाग-२ चा विद्यार्थी तोषिक राऊत यानेही आंतरविद्यापीठ वादविवाह स्पर्धा तसेच वकृत्त्व स्पर्धेत महाविद्यालयाकरिता अनेक पारितोषिक आणले. एम.ए.भाग-२ चा हिंदी विभागाचा विद्यार्थी मोईन खान यानेही वादविवाद व वकृत्त्व स्पर्धेत विद्यापीठ स्तरावर सहभाग घेवून पारितोषिक मिळविले आहे. दयानंद आर्य कन्या महाविद्यालयामध्ये आयोजित वकृत्त्व स्पर्धेत एम.ए.भाग-२ चा विद्यार्थी मोईन सिद्दीकी (हिंदी विभाग) याने प्रथम क्रमांक मिळविला. तर एम.ए. भाग-२ (हिंदी विभाग) चा विद्यार्थी मोहम्मद

D:/YP(2019)_2019_AHAWAL COLL



इकबाल यानेही गीतगायन स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळविला. अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय येथे आयोजित वादविवाद स्पर्धेत अंकीत रहांगडाले या विद्यार्थ्यांने प्रथम पारितोषिक मिळविले तर तोषिक राऊत या विद्यार्थ्यांने राष्ट्रीय छात्र सांसदेमध्ये उत्कृष्ठ वक्ता म्हणून पारितोषिक मिळविले तसेच 'लोकसत्ता' वकृत्त्व स्पर्धेमध्ये नागपूर विभागातून सहभाग नोंदविला.

दिनांक ६ डिसेंबर २०१८ रोजी महाविद्यालयाच्या परंपरेनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त एकदिवसीय व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. याकरिता प्रमुख वक्ता म्हणून मा.डॉ. अशोक पळवेकर (अमरावती) यांना व्याख्यानाकरिता आमंत्रित करण्यात आले होते. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकराना अभिप्रेत असलेली लोकशाही' या विषयावर त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या विषयावर बोलतांना ते म्हणाले- जाती, धर्म, वंश, श्रेष्ठत्त्व या आधारावरील संस्कृतीला तिलांजली देत आधुनिक भारताच्या निर्मितीसाठी संस्कृतीची गरज लक्षात घेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्या संस्कृतीची भक्कम पायाभरणी केली असा विचार त्यांनी मांडला. व्याख्यानमालेचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील यांनी केले. प्रास्ताविकातून त्यांनी व्याख्यानमालेची परंपरा विषद केली. कार्यक्रमाचे निवेदन डॉ. मनीषा नागपूरे यांनी केले तर आभार डॉ. नरेंद्र बागडे यांनी केले. अध्यक्षस्थानी माजी महापौर अटलबहादूर सिंग होते. संथेचे उपाध्यक्ष ॲड. पी.झेड. लांजेववार यांनीही याप्रसंगी विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षण, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी तसेच परीसरातील गणमान्य व्यक्ती मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

जानेवारी २०१९ मध्ये महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त होणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमाची रुपरेषा सांस्कृतिक समितीतील सदस्यांनी बैठक घेवून ठरविण्यात आली. यामध्ये विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस. कला व वाणिज्य महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाने 'कलातरंग' या वार्षिक सांस्कृतिक महोत्सवाअंतर्गत विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते. दिनांक १५ जानेवारी २०१९ ते १९ जानेवारी २०१९ या पाच दिवसामध्ये वादविवाह स्पर्धा, वक्तृत्त्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, गीतगायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा, मेहंदी, रांगाळी, हस्तकला, पोस्टर स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयाच्या सिध्दार्थ सभागृहात आयोजित केले होते.

दिनांक १५ जानेवारी २०१९ रोजी सकाळी ठीक ९-०० वाजता 'कलातरंग' या वार्षिक सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन प्राचार्याच्या हस्ते करण्यात आले. तर प्रमुख अतिथी म्हणून शारीरिक विभागाचे विभाग प्रमुख प्रा. आत्माराम पांडे उपस्थित होते. उद्घाटनानंतर वकृत्त्व स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. वकृत्त्व स्पर्धेचा विषय- "सद्यःस्थितीतील शिक्षण व्यवस्था व आजचा विद्यार्थी" हा होता. या स्पर्धेत एकुण ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेकरिता

D:/YP(2019)_2019_AHAWAL COLL



परीक्षक म्हणून अर्थशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. प्रज्ञा बागडे व मराठीचे प्राध्यापक (कनिष्ठ महाविद्यालय) किशोर वरभे यांनी काम केले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक हिंदी विभागातील एम.ए.भाग-२ चा विद्यार्थी मोईन खान या विद्यार्थ्यांने पटकाविला तर द्वितीय क्र. बी.ए. भाग-२ चा विद्यार्थी संकेत मोटघरे या विद्यार्थ्यांने मिळविला. तृतीय क्र. बी.कॉम. भाग-३ चा विद्यार्थी रोशन तातड याने मिळविला.

दिनांक १६ जानेवारी २०१९ ला सकाळी ठिक ८-०० वाजता वादविवाद स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. वादविवाद स्पर्धेचा विषय- 'सोशल मिडीयाचे वाढते प्रस्थ योग्य की अयोग्य' असा होता. या स्पर्धेत ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेकरिता परीक्षक म्हणून प्रा. आत्माराम पांडे सर (शारीरिक शिक्षण विभाग) व प्रा.अमोल मेंढे (इंग्रजी विभाग) यांनी जबाबदारी पार पाडली. या स्पर्धेत प्रथम पारितोषिक एम.ए. प्रथम वर्ष (हिंदी) मोईन सिद्दिकी व पुर्णिमा राजमलानी या विद्यार्थ्यांनी पटकाविला, तर द्वितीय क्र. तोषिक राऊत, बी.ए.भाग-२ व अंकीत रहांगडाले बी.कॉम.भाग-२ च्या विद्यार्थ्यांना मिळाला.

दिनांक १७ जानेवारी २०१९ रोजी सकाळी ११-३० वाजता नृत्य व गीतगायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नृत्यस्पर्धेकरिता परीक्षक म्हणून डॉ. नरेंन्द्र बागडे आणि प्रा. पत्राळे मॅडम (कनिष्ठ महाविद्यालय) यांनी काम केले. या स्पर्धेत २५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. नृत्यस्पर्धेमध्ये प्रथम पारीतोषिक अंकीता बारसागडे एम.ए.भाग-२ (इतिहास), द्वितीय पारीतोषिक श्रध्दा ठाकूर बी.कॉम.भाग-१ व उत्तेजनार्थ पारितोषिक बी.ए. भाग-२ चा विद्यार्थी विकास लोखंडे यांना मिळाले.

गीतगायन स्पर्धेमध्ये परीक्षक म्हणून डॉ. कमलाकर तागडे आणि प्रा. अमोल मेंढे यांनी ही जबाबदारी पार पाडली. या स्पर्धेमध्ये एकूण ३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत प्रथम पारीतोषिक इकबाल शेख एम.ए.भाग-१ (हिंदी विभाग) द्वितीय पारीतोषिक सेजल कुर्वे बी.कॉम. भाग-१ ची विद्यार्थीनी यांना मिळाले, तर प्रोत्साहनपर पारीतोषिक मोहसिन खान व प्रतिक्षा बुटे यांना मिळाले.

दिनांक १८ जानेवावरी २०१९ रोजी मेंहदी स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, हस्तकला स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेकरिता परीक्षक म्हणून अनुक्रमे- प्रा.अश्विनी गिरडे, डॉ.विमल राठोड, प्रा.रश्मी मुळे, प्रा.गामीनी मेश्राम, प्रा. महेश दुधे, प्रा. मनोहर येरकलवार डॉ. रजनी सोनटक्के व प्रा. वर्षा बन्सोड यांनी जबाबदारी पार पाडली. मेहंदी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक चेतना पराते बी.कॉम.भाग-१, द्वितीय क्र. प्रतिक्षा टेंभुर्णे बी.कॉम.भाग-२ व प्रोत्साहन पर पारीतोषिक अक्षय मोहनकर यांना देण्यात आले. रांगोळी स्पर्धेत प्रथम क्र. अक्षय मोहनकर बी.कॉम. भाग-१, द्वितीय क्र. भारती शास्त्री एम.ए.भाग-२ (मराठी) यांना देण्यात आले.

D:/YP(2019)_2019_AHAWAL COLL



दिनांक १९ जानेवारी २०१९ ला निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. निबंध स्पर्धेचा विषय- 'मोबाईल संस्कृती आणि नवीन पीढी' असा होता. निबंध स्पर्धेत एकूण ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. निबंध स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. सुमेध नागदेवे आणि डॉ. महेन्द्र गायकवाड यांनी जबाबदारी पार पाडली. या स्पर्धेत प्रथम क्रमांक- कु. मुणालीनी कांबळे बी.ए.भाग-१ (हिंदी विभाग) या विद्यार्थीनीला मिळाला तर द्वितीय क्र.-नितेश आडे एम.ए.भाग-२ (इंग्रजी विभाग) या विद्यार्थ्यांला मिळाला.

'कलातरंग' या वार्षिक महोत्सवाचा समारोप २० जानेवारी २०१९ ला करण्यात आला. समारोपाला प्रमुख अतिथी म्हणून किशोरजी गजभिये यांना आमंत्रित करण्यात आले होते. डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त महाविद्यालयात- "सुवर्णमहोत्सवी क्षण उजाळतांना......... प्रेरक भविष्याकडे वाटचाल.......!" या शिर्षकातंर्गत महाविद्यालयात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सांस्कृतिक कार्यक्रमाचा मुख्य उद्देश्य म्हणजे महाविद्यालयाच्या ५० वर्षाच्या वाटचालीत फुले-शाहू-आंबेडकरांच्या प्रकाशमान विचारांचा वारसा घेवून महाविद्यालयाने महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीत व परिवर्तनशील प्रक्रियेत निष्ठेने सहभाग घेतला. यात उत्तर नागपूरातील अनेक मान्यवारांचा व विचारवंताचा सहभाग राहिला आहे. यानिमित्ताने त्यांचे पायधुळ महाविद्यालयाला लाभावी व त्यांच्या वैचारिक संपत्तीचा लाभ विद्यार्थ्यांना व्हावा म्हणून अनेक चळवळीत कार्य करुन सामाजिक बांधीलकी जपणारे विचारवंत, IPS अधिकारी, बाबासाहेबांच्या विचारधारेवर चालणारे आंबेडकर चळवळीचे अनुयायी, ज्यांनी महाविद्यालयाच्या विकास कार्यात हातभार लावला असे माजी प्राचार्य यांना याप्रसंगी निमंत्रित करुन त्यांचा सन्मान करण्यात आला व सोबतच त्याच्याकडून बौध्दिक मेजवानी ही विद्यार्थ्यांना प्राप्त झाली.

दि. १७ जानेवारी २०१९ रोजी सकाळी १०-३० वाजता 'बाबा का जागले? का रडले??' हे डॉ. बाबासोब आंबेडकरांच्या जीवनावर आधारीत नाटक डॉ. बाबासाहेब सांस्कृतिक मंडळ, नागपूर यांच्याकडून सादर करण्यात आले. कनिष्ठ महाविद्यालयातील एम.सी.व्ही.सी. विभागातील विभाग प्रमुख प्रा.राजेंद्र गायकवाड आणि त्यांचा संच यांनी अतिशय उत्कृष्ठ असे सादरीकरण करुन श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. शेवटी संपूर्ण सभागृह अक्षरशः शोकमग्न झाले. अत्यंत जीवंत अशा व्यक्तीरेखा या नाटकातून साकार करण्यात आल्या.

दिनांक १८ जानेवारी २०१९ ला सकाळी १०-३० वाजता IPS अधिकारी मा. दिक्षीतकुमार गेडाम यांच्या कार्याची यशोगाथा सांगणाऱ्या 'यशोगाथा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्री. दिक्षीतकुमार गेडाम हे उत्तर नागपूरातील व्यक्तीमत्त्व असून त्यांनी स्वतः आपण कसे घडत गेलो यादृष्टिने विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर आपल्या कार्याची यशोगाथा सांगितली. या कार्यक्रमाला

D:/YP(2019)_2019_AHAWAL COLL



अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे माजी प्राचार्य मा.जानरावजी गजभिये उपस्थित होते. विद्यार्थ्यांना घडविण्याच्या दृष्टिने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक १९ जानेवारी २०१९ ला IPS अधिकारी तसेच माजी सनदी अधिकारी, सचिव-सामाजिक व न्यायविभाग महाराष्ट्र राज्याचे मा. किशोर गजभिये यांचे "मंचधैर्य, वकृत्त्वकला व व्यक्तिमत्त्व विकास" यावर विशेषतः मुलींकरिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मुलींमध्ये या गुणांचा विकास व्हावा व ती आत्मविश्वासाने व्यासपीठावर उभी राहावी हा मुख्य उद्देश्य या कार्यशाळेचा होता. PPT च्या माध्यमातून व प्रत्यक्ष अनुभवातून त्यांनी विद्यार्थ्यांना अनेक गोष्टी शिकविल्या, तसेच वकृत्त्वकला व व्यक्तिमत्त्व विकास कसा साधावा यावर धडे दिले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या मा.डॉ. प्रणोती चक्रवर्ती अध्यक्षस्थानी उपस्थित होत्या. त्यांनीही विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले.

दिनांक २१ जानेवारी २०१९ सोमवार ला महाराष्ट्र भूषण पुरस्कार पुरस्कृत नामवंत प्रबोधनकार मा. तुषार सुर्यवंशी या तडफदार युवकाचे 'प्रबोधनाकडून परिवर्तनाकडे' या शिर्षकातंर्गत विद्यार्थ्यांकरिता जबरदस्त प्रबोधन झाले. या युवा कलाकाराने संपूर्ण युवा विद्यार्थ्यांना आपल्या प्रबोधनातून परिवर्तनाचे महत्त्वपूर्ण धडे दिले. व्यसनापासून तर अंधश्रध्देपर्यंत, राजकारणापासून तर सोशाल मिडीयापर्यंत सर्व विषयांवर अतिशय विनोदी पध्दतीने त्यांनी विद्यार्थ्यांना जागृत केले. नवीन पीढी घडविण्याकरिता त्यांचे प्रबोधन विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरले.

दिनांक २५ जानेवारी २०१९ शुक्रवार ला सकाळी १०-३० वाजता कवीवर्य प्रा. ज्ञानेश वाकुडकर यांचे 'शंभर युवा-महाराष्ट्र नवा', 'सखी साजनी' अशा विषयावर विद्यार्थ्यांशी त्यांनी दिलखुलास गप्पा मारल्या. आपल्य काव्यमय शैलीत त्यांनी युवा शक्तीचे महत्त्व विषद करुन युवकांना जागृत केले. युवकांकरिता हा कार्यक्रम फार महत्त्वपूर्ण ठरला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य डॉ. रमेश गान उपस्थित होते. त्यांनीही आपल्या भाषणातनून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

---